# MAHARASHTRA FILM, STAGE & CULTURAL DEVELOPMENT CORPORATION LIMITED

(A Government of Maharashtra Undertaking)

## Dadasaheb Phalke Chitranagari

Filmcity, Mumbai

https://filmcitymumbai.org

**दादासाहेब फाळके चित्रनगरीतील निर्मितीसंस्थासाठी 'स्वच्छतेची मार्गदर्शक नियमावली' जाहीर**

---------------------------------------

**नियमावलीचे पालन न केल्यास ५ हजाराचा दंड**

----------------------------------

**चित्रनगरी स्वच्छ-सुंदर ठेवण्यासाठी व्यवस्थापकीय संचालक डॉ. अविनाश ढाकणे यांचे महत्वपूर्ण पाऊल**

------------------------------------

दाफचि गोरेगाव २९: महाराष्ट्र चित्रपट,रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळातर्गत कार्यरत असणारी, येथील जगप्रसिद्ध 'दादासाहेब फाळके चित्रनगरी' स्वच्छ-सुंदर ठेवण्यासाठी व्यवस्थापकीय संचालक डॉ.अविनाश ढाकणे यांनी 'स्वच्छतेची मार्गदर्शक नियमावली' जाहीर केली आहे. चित्रनगरी परिसरात चित्रीकरण करत असलेल्या निर्मितीसंस्थानां ही नियमावली बंधनकारक असून नियमावलीचे पालन न करणाऱ्यास  नियमानुसार ५ हजाराचा दंड आकारण्यात येणार आहे.

स्वच्छता नियमावलीनुसार निर्मितीसंस्थांनी चित्रीकरण स्थळांवरील हिरवी व निळी कचरा कुंडीमध्ये ओला व सुका कचरा ठेवायचा आहे. तसेच वापरलेल्या पिण्याच्या पाण्याच्या प्लास्टिक बाटल्या व इतर प्लास्टिक व पुन्हा वापरण्यायोग्य नसलेले लाकूड, बांबू, तार, लोखंडी साहित्य इ.बाबी एकत्रित करून वेगळे ठेवण्याची सूचना करण्यात आली आहे. चित्रीकरण पूर्ण  झाल्यानंतर वापरलेली जागा स्वच्छ करून देण्याची जबाबदारी संबधित निर्मिती संस्थेची आहे. त्यामुळे या ठिकाणचा जीओ टॅग फोटो (Geotag photo ) स्टूडीओ विभागाकडे चित्रीकरण संपल्यानंतर त्याच दिवशी ७७३८८26१८६ मोबाईल क्रमांकावर whatsapp द्वारे सादर करणे अनिवार्य करण्यात आले आहे.

कचरा विलगीकरणासाठी आवश्यक ( हिरवी,पिवळी,निळी ) पिशव्या महामंडळामार्फत मोफत उपलब्ध देण्यात येणार आहेत. बाहय चित्रीकरण स्थळांवर पुरेसे स्वच्छ प्रसाधनगृह उपलब्ध केलेले आहेत. परंतू अनेकदा याचा वापर न करता रस्त्याचा किंवा मोकळ्या जागेचा वापर केला जातो. त्यामुळे परिसरात

दुर्गंधी पसरते असे होऊ नये यासाठी निर्मितीसंस्थेने सर्व कामगार आणि कलाकारांना सुचना देण्याचेही आवाहन करण्यात आले आहे.

**नियमावलीचे पालन न केल्यास ५ हजाराचा दंड**

जर निर्मिती संस्थेकडून स्वच्छता विषयक मार्गदर्शक सुचनांचे पालन न केल्याची बाब निदर्शनांस आल्यास,नियमाप्रमाणे पाच हजाराचा दंड आकारणी करण्यात येणार आहे. चित्रनगरी परिसर स्वच्छ व सुंदर ठेवण्यासाठी प्रशासनास नियमांचे पालन करून सहकार्य करावे आणि चित्रनगरीचा लौकिक वाढवण्यास मदत करावी असे आवाहन महामंडळाने केले आहे.

-----------------------------------

जनसंपर्क विभाग